नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील गट-अ ते ड मधील
अधिकारी/कर्मचारी यांनी शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे,
गोपणीय अहवाल व मत्ता दायीत्व सादर करणे बाबत.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

जा.क्र.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-१/ 2098 /२०२४ दिनांक :- 16 JUN 2024

वाचा:- .१ महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग,शासन निर्णय नामपा-२०२३ प्र.क्र.४ /नवि-२४ दि.१४.०२.२०२३
२ महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग,शासन निर्णय नामपा-२०२३/प्र.क्र.९५/नवि-२४दि.११.०३.२०२४.

<u>परिपत्रक</u>

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे उपरोक्त शासन निर्णयान्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचा आकृतीबंध व सेवा (सेवा प्रवेश व सेवाचे वर्गिकरण) नियम २०२४ ला मान्यता दिलेली असुन, त्याअनुषंगाने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत असलेल्या गट-अ ते गट-ड मधील कर्मचा-यांना पदोन्नती देणे सदंर्भात कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे.

सदंर्भ क्र.02 अन्वये सेवा (सेवा प्रवेश व सेवाचे वर्गिकरण) नियम २०२४ नुसार पदोन्नतीचे पदे पदोन्नतीने भरावयाच्या सर्व पदास आवश्यकती शैक्षणिक अर्हता नमूद करण्यात आलेली आहे.

सेवाप्रवेश नियमातील नमूद केलेली शैक्षणिक अर्हता धारण करित असलेले नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत कार्यरत असणा-या सर्व गट-अ ते गट-ड मधील अधिकारी/ कर्मचारी यांनी (07) दिवसाच्या आत शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र,गोपणीय अहवाल (मागील पाच वर्षाचे), मत्ता व दायीत्वाचे वार्षिक विवरणपत्रे (गट-ड वगळुन) सादर करण्यात यावे.

तसेच लिपिक टंकलेखक व वरिष्ठ लिपिक या संवर्गात कार्यरत कर्मचा-यांनी लेखा सेवेत (लेखा लिपिक, वरिष्ठ लिपिक (लेखा) या संवर्गातील पदावर संवर्ग बदलीने जाण्यास इच्छुक असलेल्या व वाणिज्य शाखेची शैक्षणिक अर्हताधारण करीत असलेल्या कर्मचा-यांनी (07) दिवसाच्या आत शैक्षणिक अर्हतेच्या कागदपत्रासह अर्ज व संवर्ग बदलीकरीता समंतीपत्र सादर करण्यात यावे. जे अधिकारी/कर्मचारी विहित मुदतीत अर्ज व समंतीपत्र सादर करणार नाहीत अशा अर्जावर विचार केला जाणार नाही, यांची नोंद घेण्यात यावी.

आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

प्रत:

१) सिस्टीम मॅनेजर संगणक विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना देवुन सुचित करण्यात येते की सदरचे परिपत्रक, महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.
२) सर्व विभाग प्रमुख, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी आपल्या अधिनिस्त सर्व अधिकारी /कर्मचा-यांना सदर परिपत्रकाची प्रत्यक्ष माहीती देण्यात यावी.
3) सर्व स्वच्छता निरिक्षक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना देऊन आदेशीत करण्यात येते की आपल्या अधिनिस्त सर्व सफाई कामगारांना सदर परिपत्रकांची माहीती/सुचना देण्यात याव्यात.
४) नोटीस बोर्ड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

06.06.24

Scanned with OKEN Scanner